# इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना

- **उद्देश :**

केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार राज्यातील दारिद्रय रेषेखालील नोंद असलेले ६५ व ६५ वर्षावरील निराधार वृध्द व्यक्ती या योजनेमध्ये पात्र राहतील.

**केंद्र पुरस्कृत योजना :-**

या योजनेमध्ये ग्रामीण भागाकरिता दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या घेतलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ६५ च ६५ वर्षावरील निराधार वृध्द व्यक्ती पात्र होतील. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रुपये २००/- प्रतिमास प्रति लाभार्थी निवृत्ती वेतन इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेतून देण्यात येईल. याच लाभार्थ्यांना राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून रुपये ४००/- प्रतिमाह इतके निवृत्तीवेतन मिळेल. यामुळे या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रुपये २००/- व राज्य शासनाकडून रुपये ४००/- असे एकूण ६००/- प्रतिमाह प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन मिळेल.